JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# अमरावती जिल्हयातील महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाचा अभ्यास

**संशोधक**
**कु. रश्मी विनोदराव घोडमारे**
एम.ए (मराठी, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र), एम.एड.
**डॉ. वनिता ना. काळे**
प्राध्यापक (श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती)

**गोषवारा :–**

महाविद्यालयीन शिक्षकांना उच्च पातळीवरील तणावाचा सामना करावा लागतो. परिवर्तने, पगार, कामाचे वातावरण, कामाचा दबाव, कौंटूबिक जबाबदाऱ्या, आजारपण, आर्थिक अडचणी, वेगवेगळया संस्कृतीतील विदयार्थ्यांना अध्यापन इत्यादी घटक तणाव निर्माण करण्यात महत्त्वपुर्ण भूमिका बजावतात. तणावाचा शिक्षकांच्या कार्यक्षमतेवर आणि महाविद्यालयाच्या परिणामकारकतेवर सारखाच प्रभाव पडतो. या संशोधनाचे उद्दिष्टय अमरावती जिल्हयातील महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाचा अभ्यास करणे हा आहे. माहितीचे संकलन वर्णनात्मक (सर्वेक्षण) पध्दतीने करण्यात आल आहे. या संशोधनासाठी सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने 100 महाविद्यालयीन शिक्षकांची निवड करण्यात आली. या संशोधनासाठी साधन म्हणून महाविदयालयीन शिक्षकांना लागू होणारी संशोधक निर्मित 5 बिंदू मतावली चाचणी तयार करून प्रमाणित करण्यात आली व या साधनांचा वापर करून माहितीचे संकलन करण्यात आले. टी–टेस्ट या साख्यिकीय तंत्राने माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले. संशोधनातुन असे आढळून आले की, अमरावती जिल्हयातील महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाचे शिक्षकांचे लिंग, वय, पात्रता, नोकरीची स्थिती (सरकारी/खाजगी) आणि अनुभव यांच्याआधारे पातळीची तुलना केली असता त्यांच्या ताणाच्या पातळीमध्ये सार्थक फरक आहे आणि नाही पण. जसे लिगांच्या आणि नोकरीची स्थिती या सदर्भात सार्थक फरक आहे. तसेच वय, पात्रता आणि अनुभवया सदर्भात सार्थक फरक नाही.

**मुख्य शब्द :** व्यावसायिक ताण, अमरावती जिल्हयातील महाविद्यालय शिक्षक, अध्यापनाचा प्रभाव, लिंग, वय, पात्रता, नोकरीची स्थिती, अनुभव.

**प्रस्तावना :–** शैक्षणिक प्रकियेत शिक्षकाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षण हे एक माध्यम आहे ज्याद्वारे उद्दिष्टये, ध्येये आणि योजना प्रत्यक्षात आणता येतात. यासाठी शिक्षकांचे मानसिक व शारीरिक स्वास्थ चांगले असले पाहिजे. अध्यापन हा एक असा पेशा/व्यवसाय आहे जिथे दररोज शैक्षणिक व्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल होत असतात. या बदलांमुळे शिक्षकांमधील ताणतणाव कमी होण्याऐवजी वाढतच आहेत. किसूर आणि सोलोमन यांच्या मते, "शिक्षकांच्या कार्यक्षमतेतील तथ्य जसे की सर्जनशीलता, वर्ग खोली व्यवस्थापन आणि शैक्षणिक तंत्राची अमंलबजावणी यांना जेव्हा शिक्षकांना उच्च पातळीचा ताण येतो तेव्हा त्रास होऊ शकतो."

**समस्या विधान :–** अमरावती जिल्हयातील महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाचा अभ्यास

**गरज व महत्त्व :–** गर्दीचे वर्ग, भरीव अभ्यासक्रम आणि अपुऱ्या सुविधा यामुळे शिक्षकांचे काम अधिक गुंतागुंतीचे होते अध्यापन प्रकिया आजच्या काळात उपयोगी बनविण्यासाठी शिक्षकांच्या समस्या विशेषतः त्याची योग्यता आणि मानसिक व्यथा ओळखण्याची वेळ आली आहे. बदललेल्या जगाला तोंड देताना नैराश्य, संघर्ष, चिंता आणि तणाव आणि अशा अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. प्रभावी अध्यापन शिक्षण प्रक्रियाद्वारे अपेक्षित शैक्षणिक उद्दिष्टये साध्य करण्यासाठी अध्यापन हे संवेदनशील शस्त्र आहे. शिक्षण ही बहुआयामी प्रकिया आहे जी वर्तणुकीच्या पद्धतीमध्ये बदल करते. आपण शिक्षकांना चिंता, तणाव इत्यादीपासून दूर केले पाहिजे, जेणेकरून शिक्षक त्यांच्या पुर्ण क्षमतांचा उपयोग करून अध्यापन प्रकिया प्रभावीपणे करू शकेल. प्रभावी अध्यापन केवळ मानसिकदृष्टया सक्षम शिक्षकांमुळेच शक्य आहे त्यामुळे शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. तसेंच शिक्षकांवर केल्या जाणाऱ्या संशोधनासाठी मार्गदर्शक ठरेल.

**संशोधन प्रश्न :–**

1. व्यावसायिक ताण कसा कमी करता येईल ?
2. शिकवण्याची क्षमता म्हणजे काय ?
3. शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाचा अध्यापन क्षमतेवर किती प्रभाव पडतो ?

**संशोधनाची उद्दिष्टये :–**

1. अमरावती जिल्हयातील महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाचा अभ्यास करणे.
2. अमरावती जिल्हयातील महाविद्यालयीन शिक्षकांचे लिंग, वय, पात्रता, नोकरीची स्थिती (सरकारी/खाजगी) आणि अनुभवांच्या आधारे शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना :–**

1. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत पुरूष व महिला शिक्षक यांच्या मध्यमानात सार्थक फरक नसतो.
2. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत 40 वर्षापेक्षा जास्त व 40 वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या शिक्षकांच्या मध्यमानात सार्थक फरक नसतो.
3. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत पदव्युत्तर पदवी आणि आचार्य पदवी प्राप्त असणाऱ्या शिक्षकांच्या मध्यमानात सार्थक फरक नसतो.
4. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत सरकारी महाविद्यालय आणि खाजगी महाविद्यालयातील शिक्षकांच्या मध्यमानात सार्थक फरक नसतो.
5. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत 15 वर्षापेक्षा जास्त व 15 वर्षापेक्षा कमी अनुभव असणाऱ्या शिक्षकांच्या मध्यमानात सार्थक फरक नसतो.

**गृहितके :–**

1. महिलांपेक्षा पुरूष जास्त ताणतणावात असतात.
2. वयाने जास्त असणारे शिक्षक जास्त समजदार व आनंदी असतात.
3. जेवढे जास्त शैक्षणिक पात्रता तेवढे जास्त ज्ञान व माहितीचा साठा अधिक असतो.
4. सरकारी महाविद्यालयीतील शिक्षकांना मिळणारा मोबदला जास्त असल्यामुळे ते खाजगी महाविद्यालयीतील शिक्षकांपेक्षा अधिक समाधानी असतात.
5. जास्त अनुभव असणारे शिक्षक कमी अनुभव असणाऱ्या शिक्षकांच्यातुलनेत अधिक समाधानी असतात.

**व्याप्ती :–**

1. प्रस्तुत संशोधनात अमरावती जिल्हयातील महाविद्यालयीन शिक्षकांचाच समावेश करण्यात आला आहे.
2. प्रस्तुत संशोधनात अमरावती जिल्हयातील शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाचाच अभ्यास करण्यात आला आहे. समाधानाचाच अभ्यास करण्यात आला.

**मर्यादा :–**

1. प्रस्तुत संशोधनात अमरावती जिल्हयातील महाविद्यालयीन शिक्षकांपर्यंतच मर्यादित आहे.
2. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाच्या अभ्यासापुरतेच मर्यादित आहे.

**संशोधनाची कार्यपध्दती**

प्रस्तुत संशोधनात हे वर्तमान काळातील असल्यामुळे तथ्य संकलन करुन संशोधन करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनात अमरावती जिल्हयातील महाविद्यालयीन शिक्षकांचा समावेश जनसंख्येत करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनात महाविदयालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत शिक्षकांचे लिंग, वय, पात्रता, नोकरीची स्थिती (सरकारी / खाजगी) आणि अनुभवांच्या आधारे तुलनात्मक अभ्यास करावयाचा असल्याने महाविदयालयीन शिक्षक 100(पुरूष 50 आणि महिला 50) अशा एकूण 100 व्यक्तींची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे. नमुन्याची निवड सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने करण्यात आली. प्रस्तुत संशोधनात व्यावसायिक ताण याचा अभ्यास असल्यामुळे महाविदयालयीन शिक्षकांना लागू होणारी संशोधक निर्मित 5 बिंदू मतावली चाचणी तयार करून प्रमाणित करण्यात आली व या साधनांचा वापर करण्यात आला. प्रस्तुत संशोधनाचे स्वरुप तुलनात्मक असल्याने त्यात महाविदयालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत शिक्षकांचे लिंग, वय, पात्रता, नोकरीची स्थिती (सरकारी / खाजगी) आणि अनुभव या चलांची तुलना करण्यासाठी टी टेस्ट या सांख्यिकीय तंत्राची निवड करण्यात आली. चाचणीद्वारे माहितीचे संकलन करून विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

**परिकल्पना पडताळणी**

1. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत पुरूष व महिला शिक्षक यांच्या मध्यमानात फरक दर्शविणारी सारणी

| महाविद्यालयीन शिक्षक | शिक्षकांची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त टी मुल्य | सार्थकता स्तर | सारणी टी मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरूष शिक्षक | 50 | 39.22 | 4.25 | 1.05 | 2.94 | 0.05 | 1.97 | सार्थक |
| महिला शिक्षिका | 50 | 40.93 | 4.85 | | | 0.01 | 2.60 | सार्थक |

2. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत 40 वर्षापेक्षा जास्त व 40 वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या शिक्षकांच्या मध्यमानात फरक दर्शविणारी सारणी

| महाविद्यालयीन शिक्षकांचे वय | शिक्षकांची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त टी मुल्य | सार्थकता स्तर | सारणी टी मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 40 वर्षापेक्षा जास्त | 50 | 19.08 | 3.84 | 0.60 | 1.56 | 0.05 | 1.97 | असार्थक |
| 40 वर्षापेक्षा कमी | 50 | 20.10 | 3.93 | | | 0.01 | 2.60 | असार्थक |

3. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत पदव्युत्तर पदवी आणि आचार्य पदवी प्राप्त असणाऱ्या शिक्षकांच्या मध्यमानात फरक दर्शविणारी सारणी

| महाविद्यालयीन शिक्षकांची पात्रता | शिक्षकांची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त टी मुल्य | सार्थकता स्तर | सारणी टी मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदव्युत्तर पदवी प्राप्त असणारे शिक्षक | 50 | 25.38 | 2.91 | 0.99 | 1.32 | 0.05 | 1.97 | असार्थक |
| आचार्य पदवी प्राप्त असणारे शिक्षकां | 50 | 27.55 | 2.78 | | | 0.01 | 2.60 | असार्थक |

4. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत सरकारी महाविद्यालय आणि खाजगी महाविद्यालयातील शिक्षकांच्या मध्यमानात फरक दर्शविणारी सारणी

| महाविद्यालयीन शिक्षकांची नोकरीची स्थिती | शिक्षकांची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त टी मुल्य | सार्थकता स्तर | सारणी टी मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सरकारी महाविद्यालयातील शिक्षक | 50 | 42.22 | 5.25 | 2.10 | 3.07 | 0.05 | 1.97 | सार्थक |
| खाजगी महाविद्यालयातील शिक्षक | 50 | 50.93 | 5.85 | | | 0.01 | 2.60 | सार्थक |

5. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत 15 वर्षापेक्षा जास्त व 15 वर्षापेक्षा कमी अनुभव असणाऱ्या शिक्षकांच्या मध्यमानात फरक दर्शविणारी सारणी

| महाविद्यालयीन शिक्षकांचा अनुभव | शिक्षकांची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त टी मुल्य | सार्थकता स्तर | सारणी टी मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 15 वर्षापेक्षा जास्त अनुभव असणारे शिक्षक | 50 | 23.44 | 2.61 | 1.22 | 1.35 | 0.05 | 1.97 | असार्थक |
| 15 वर्षापेक्षा कमी अनुभव असणारे शिक्षक | 50 | 20.96 | 2.73 | | | 0.01 | 2.60 | असार्थक |

**निष्कर्ष :–**

1. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत पुरूष व महिला शिक्षक यांच्या मध्यमानात सार्थक फरक असल्याचे आढळून आले.
2. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत 40 वर्षापेक्षा जास्त व 40 वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या शिक्षकांच्या मध्यमानात सार्थक फरक नसल्याचे आढळून आले.
3. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत पदव्युत्तर पदवी आणि आचार्य पदवी प्राप्त असणाऱ्या शिक्षकांच्या मध्यमानात सार्थक फरक नसल्याचे आढळून आले.
4. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत सरकारी महाविद्यालय आणि खाजगी महाविद्यालयातील शिक्षकांच्या मध्यमानात सार्थक फरक असल्याचे आढळून आले.
5. महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाबाबत 15 वर्षापेक्षा जास्त व 15 वर्षापेक्षा कमी अनुभव असणाऱ्या शिक्षकांच्या मध्यमानात सार्थक फरक नसल्याचे आढळून आले.

या संशोधनावरून असे आढळून आले की, अमरावती जिल्हयातील महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक ताणाचे शिक्षकांचे लिंग, वय, पात्रता, नोकरीची स्थिती (सरकारी/खाजगी) आणि अनुभव यांच्याआधारे पातळीची तुलना केली असता त्यांच्या ताणाच्या पातळीमध्ये सार्थक फरक आहे आणि नाही पण. जसे लिगांच्या आणि नोकरीची स्थिती या सदर्भात सार्थक फरक आहे. तसेच वय, पात्रता आणि अनुभवया सदर्भात सार्थक फरक नाही. व्यावसायिक ताण कमी करण्यासाठी महाविद्यालयांनी कारणे लक्षात घेवून त्यावर उपाय योजना केल्या पाहीजे. शासनाने शिक्षकांवर अध्यापना व्यतिरिक्त इतर कामे लादण्यापेक्षा त्या कामासाठी दुसऱ्या व्यक्तीची नेमणूक केली पाहिजे. तणावग्रस्त शिक्षकांचे समुपदेशन करण्याची सुविधा उपलब्ध केली पाहीजे. शिक्षकांचे वेळोवेळी प्रोत्साहन केले पाहीजे.

**संदर्भ**


1. दिनहॅम, एस. ''तणावाखाली असलेले शिक्षक'', ऑस्ट्रेलियन शैक्षणिक संशोधन (1993).
2. इसेस.एफ, ''शिक्षकांचा व्यावसायिक ताण : तुर्की आणि मॅसेडोनिया दरम्यान तुलनात्मक अभ्यास मानवता आणि सामाजिक विज्ञान'', आंतरराष्ट्रीय जर्नल, खंड 1, क्रमांक (विशेष अंक– जून 2011) पान क्रमांक 59.
3. कौर, एस. ''खाजगी आणि सरकारी शिक्षकांमधील व्यावसायिक तणावाचा तुलनात्मक अभ्यास, त्यांचे वय, लिंग आणि शिकविण्याच्या अनुभवाशी संबंधित शाळा, शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाचे'', आंतरराष्ट्रीय जर्नल, 2249 –3093 खंड 1, क्रमांक 2 (2011) पान क्रमांक 151–160.